शहरातील नागरीकांनी अवयवदानासाठी पुढाकार घेण्याचे मनपाचे आवाहन >>पान 2

मराठी सिनेमांना मल्टीप्लेक्समध्ये अतिरिक्त 'शोज' मिळवून देण्यासाठी समिती स्थापन : उपमुख्यमंत्री शिंदे यांची घोषणा >>पान 3

विशेष सहाय योजनेतील डिबीटी न झालेल्या लाभार्थ्यांना घरभेटी करून डिबीटी व्दारे अनुदानाचे वाटप करणे >>पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 18 ■ बुधवार, दि. 06 ऑगस्ट 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

**सुविचार**

कृतज्ञता हेच जीवनातील समाधान आहे.




**कॉमेडी किंग भाऊ कदम झाला सिरियल किलर?**

आतील पान

# दिवाळी नंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होण्याचे संकेत

## राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांची माहिती

**नाशिक/प्रतिनिधी : दिवाळी नंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होण्याचे संकेत आहेत. अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली. राज्य निवडणूक आयोग मार्फत नाशिक विभागीय बैठक घेण्यात आली.यावेळी ते माध्यमांशी संवाद साधताना बोलत होते.**





यावेळी ते म्हणाले की, नंदुरबार, जळगाव, धुळे, नाशिक, अहिल्या नगर याचा आढावा घेण्यात आला. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही बैठक होती. चार महिन्याचा कालावधी यासाठी होता.पूर्व तयारीच्या अनुषंगाने ही बैठक होती मतदार यादी, मतदान केंद्र निश्चित करणे याच बरोबर मतदानाच्या साहित्याची माहिती याचा सगळा आढावा घेतला.आवश्यक असलेले सामग्रीचा आढावा घेतलेले आहे. एकूण नाशिक विभागात ५० लाख ४५ हजार मतदार आहेत.चार हजार ९८२ मतदान केंद्र निश्चित करण्यात आले आहेत. ८५०० युनिट लागणार आहेत. मनुष्यबळाचा आढावा घेण्यात आलेला आहे. साधारणत हे इलेक्शन स्टँडर्ड पद्धतीने कंडक्ट करणार आहोत. वॉर्ड आरक्षण निश्चित करणे गरजेचे आहे. मतदान याद्या विभाजित होईल, फेज व्हॉईस ही निवडणूक होईल.प्रारूप प्रभाग रचना वेगवेगळे आहेत.विभागीय आयुक्त यांच्या उपस्थितीत हरकती सूचना मागविण्यात आलेल्या आहेत.सर्वोच्च न्यायालयाने जो निर्णय दिलेला आहे.त्यांनी बठिया आयोगाच्या अगोदर परिस्थिती पाहून निकाल दिलेला आहे. १ जुलै पर्यंत मतदार यादीत जे नाव असेल ते गृहीत धरून मतदार निश्चित होईल.कुठले मतदार अड करायचे आणि कुठले डिलिट करायचे याचे अधिकारी निवडणूक आयोगाला नाही. वॉर्ड रचना, २०११ पर्यंत झालेल्या जनगणने नुसार झालेली आहे. ओबीसी आरक्षण लॉटरी प्रमाणे होईल. रोटेशन व्हाइस ही आरक्षण सोडत निघेल. निवडणूक कधी लागेल हे आज सांगता येत नाही. दिवाळी नंतर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होण्याची शक्यता आहे.३० टक्के मतदान केंद्र हे पूर्ण विभागात वाढलेले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक साठी व्हीव्हीपीएटी मशीन राहणार नाही.अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली.

## झेडपी, महापालिका, नगरपालिकांच्या निवडणुकीत व्हीव्हीपॅट मशिन नसणार

### निवडणूक आयुक्तांनी स्पष्टच सांगितलं

**नाशिक/प्रतिनिधी :** सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर सर्वच राजकीय पक्ष आणि नागरिकांनाही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेध लागले आहे. त्याच अनुषंगाने निवडणूक आयोगानेही तयारी सुरू केली असून राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज नाशिक जिल्ह्यात जाऊन आढावा घेतला. नाशिक विभागाअंतर्गत जेवढे जिल्हे येतात, त्यातील मनपा, झेडपी आणि नगरपालिका यांच्या निवडणुकांचा आढावा घेतल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाध साधला. यावेळी, आगामी निवडणुकांची माहिती दिली. त्यामध्ये, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये व्हीव्हीपॅट मशिन नसणार असल्याचे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढील ४ महिन्यात घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यासाठी, मतदान केंद्राची संख्या निश्रि्चत करणे, मतदान यंत्राची व्यवस्था करणे, निवडणुकांसाठी आवश्यक असणाऱ्या अधिकारी कर्मचारी संख्याचा आढावा घेण्यासाठी निवडणूक आयुक्तांनी आज नाशिक

## महाराष्ट्र सरकार सुरु करणार ओला, उबरसारखे प्रवासी ॲप!

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र सरकार आता ओला, उबेर आणि रॅपिडोप्रमाणे प्रवासी ॲप सुरू करणार आहे. एसटी महामंडळामार्फत राज्य शासनाचे हे अधिकृत यात्री ॲप चालवले जाईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मंगळवारी दिली. टॅक्सी, रिक्षा, टी-परमिट कार यांच्यासह सर्व खासगी प्रवासी सेवा या ॲपला जोडण्यात येणार आहेत.



सुरक्षित प्रवासाची हमी देणारं ॲप : मंत्रालयातील परिवहन मंत्र्यांच्या दालनात केंद्र व राज्य शासनाच्या ॲग्रीगेटेड धोरणाच्या आधीन राहून राज्य शासनाचे यात्री ॲप बनवण्याच्या अंतिम मसुद्यावर मंगळवारी बैठक पार पडली. या बैठकीला आमदार प्रवीण दरेकर, परिवहन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर उपस्थित होते. यावेळी चालकाला सन्मानजनक मोबदला आणि प्रवाशांना सुरक्षित प्रवासाची हमी देणारं राज्य शासनाचे अधिकृत यात्री ॲप लवकरच एसटी महामंडळामार्फत सुरू करण्यात येत असल्याची माहिती मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

## माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांचं निधन; दिल्लीतील रुग्णालयात घेतला अखेरचा श्वास

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** : जम्मू-काश्मीर, गोवा, बिहार आणि मेघालयचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांचं निधन झालं आहे. वाढत्या किडनी संसर्गामुळं सत्यपाल मलिक यांना ११ मे रोजी दिल्लीतील राम मनोहर लोहिया (आरएमएल) रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं.


डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार, त्यांच्या दोन्ही किडन्या निकामी झाल्या होत्या आणि त्यांचं डायलिसिस सुरू होतं. काही प्रमाणात आराम मिळाल्यानंतर त्यांना आयसीयूमधून आरएमएलच्या नर्सिंग होममध्ये हलवण्यात आलं होतं. परंतु नंतर त्यांना पुन्हा नर्सिंग होमच्या आयसीयूमध्ये हलवण्यात आलं. मलिक यांच्यावर नेफ्रोलॉजी विभागाचे डॉ. ललित यांच्या देखरेखीखाली उपचार सुरू होते. मिळालेल्या माहितीनुसार, सत्यपाल मलिक यांचं (५



ऑगस्ट) रोजी दुपारी १:१२ वाजता निधन झालं. नेफ्रोलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. हिमांशू महापात्रा यांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार सुरू होते. डॉ. ललित त्यांच्यावर उपचार करत होते. दरम्यान अनेकवेळा आराम मिळाल्यानंतर त्यांना आयसीयूमधून आरएमएलच्या नर्सिंग होममध्ये हलवण्यात आलं. सत्यपाल मलिक यांच्या हँडलवरून पोस्ट करून त्यांच्या बिघडणाऱ्या प्रकृतीची माहितीही अनेकवेळा देण्यात आली. काही दिवसांपूर्वी सत्यपाल मलिक यांनी सोशल मीडियाद्वारे आपले विचार व्यक्त केले होते. त्यांनी म्हटलं होतं की, मी जगलो किंवा न जगलो, मला सत्य सांगायचं आहे. सरकार त्यांना कोणत्या ना कोणत्या प्रकारे अडकवण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोपही त्यांनी केला होता. जर त्यांच्याकडं पैसे असते तर त्यांना खासगी रुग्णालयात उपचार मिळाले असते, असंही त्यांनी नमूद केलं होतं.

## राज्यातील नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी प्राधिकरण स्थापन करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी महाराष्ट्र राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण स्थापन करण्याची कार्यवाही सुरु करण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजुरी दिली. राज्यातील नद्यांचे प्रदूषण कमी करून त्यांचे पुनरुज्जीवन साध्य करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, नद्यांचे नैसर्गिक प्रवाह राखण्यासाठी आणि पुनरुज्जीवनासाठी हे प्राधिकरण विकासात्मक भूमिका बजावेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले.



मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात यासंदर्भात बैठक झाली. या बैठकीला पर्यावरण आणि हवामान बदल आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव अश्विनी भिडे, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, वातावरणीय बदल कक्षाचे संचालक अभिजित घोरपडे तसेच सल्लागार संस्थेच्या नमिता रेपे उपस्थित होत्या.प्राधिकरणाच्या रचना व संकल्पनेचे पर्यावरण मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी विस्तृत सादरीकरण केले.


नदी पुनरुज्जीवनासाठी 'डीपीआर' व खोरे व्यवस्थापन योजना मंजूर करणे, अतिक्रमण, वीज, भूसंपादन यासंबंधी अडचणी सोडवणे, राष्ट्रीय योजनांसाठी निवडक प्रकल्पांची शिफारस करणे इत्यादी महत्त्वपूर्ण कार्ये प्राधिकरणाद्वारे करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.प्राधिकरणाचे अध्यक्ष मुख्यमंत्री तर पर्यावरण मंत्री उपाध्यक्ष असणार आहेत.

यासोबतच पर्यावरण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कार्यकारी समिती कार्यरत राहील. या राज्यस्तरीय समितीमध्ये तांत्रिक तज्ञ, वित्तीय व कायदेशीर सल्लागार, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव तसेच 'आयआयटी'सारख्या प्रतिष्ठित संस्थांतील तज्ज्ञ सदस्य यांचा समावेश असेल. राज्यातील नद्यांचे शाश्वत पुनरुज्जीवन साध्य करण्यासाठी हे प्राधिकरण व्यापक काम करणार आहे. दैनंदिन कामकाजासाठी 'एमपीसीबी'चे सदस्य सचिव प्रमुख असलेले एक समर्पित सचिवालयही स्थापन करण्यात येणार आहे.

## मुंब्र्यातीलही अनधिकृत भोंगे उतरवले जाणार : किरीट सोमय्या यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** मुंब्रा मधून पॉलिटिकल आवाजाचा जास्त घोंगाट येत असतो, म्हणून मी ठरवून आज मुंब्रा आणि कळवा यांच्या पोलीस उपायुक्तांना भेटलो. कळवा येथे १४ अनधिकृत मशिदींवर भोंगे आहेत. ते काढण्याची प्रक्रिया सुरू झालेली आहे.मुंब्रा मध्ये १२२ ठिकाणी अनधिकृत भोंगे आहेत. मी पोलीस अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दात सांगितले आहे ही प्रक्रिया ताबडतोब सुरू करा, अन्यथा स्थानिक पोलिसांवर न्यायालयाचा अवमान केल्याची केस कोणीतरी करू शकतो.त्यांनी अस्वस्थ केलेलं आहे की, दोन्ही ठिकाणी अनधिकृत भोंग्यांवर १०० टक्के भोंगे मुक्त करू, राहुल गांधी असो किंवा उद्धव ठाकरे यांची सेना असो किंवा आव्हाड शरद पवार गट असो ही त्यांची लाचारी आहे. हे राजकीय नेते आहेत. त्यांना मुस्लिम मतांसाठी आदाब जनाब करावे लागते.राहुल गांधीला एकदा नाही दोनदा नाही तीनदा सुप्रीम कोर्टाने थप्पड मारली आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांपासून भारताच्या सेनेचा अपमान करत आहेत. जितेंद्र आव्हाड असो किंवा ठाकरे सेना असो ते भोंग्यांची बाजू घेणारचं. मुंबईतील भेंडी बाजार मधले सुद्धा भोंगे उतरवले, नागपाडा मधले पण गेले, मालवणीचे गेले, मानखुर्दचे पण गेले,आता मुंब्रा मधले अनधिकृत भोंगे चालू ठेवण्याच्या धमक्या राजकीय नेते देत असतात त्यांनी देत राहावे, पण मुंब्रा मधील देखील अनधिकृत भोंगे उतरवले जाणार आहेत.२००८ मध्ये खूप दबाव आणला होता. तुम्ही भाजप विश्व हिंदू परिषद आरएसएस नेत्यांची नावे घ्या, न्यायालयाने म्हटले आहे की, एटीएसच्या अधिकाऱ्यांनी पुरावे फॅब्रिकेटेड पेरले. राहुल गांधी असो सोनिया गांधी असो काँग्रेस असो आणि आता बाटलेली उद्धव ठाकरे सेना



असो मतांसाठी काहीही करू शकतात वोट जिहाद साठी काही करू शकतात. उद्धव राज यांना एकत्रित यावं लागलं. कारण प्रश्न अस्तित्वाचा आहे.अशी टिकाही यावेळी भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केली.

# एक्झिट पोलवर गोपाल आखाडे यांना सर्वाधिक पसंती

दैनिक आपला विदर्भ

## आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद निवडणुकी संदर्भात सोशल मीडियावर चर्चा : उमेदवार चाचणीसाठी नेत्यांचा कानोसा

**डोणगाव/विशेष प्रतिनिधी :** स्थानिक स्वराज्य संस्थेत अत्यंत महत्त्वाचे संस्था असलेल्या जिल्हा परिषद निवडणुकीचे पडघम वाजायला सुरुवात झाली आहे. अद्याप निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला नसला तरीही, राजकीय वातावरण मात्र, हळूहळू तापत असल्याचे चित्र राजकीय वर्तुळात दिसून येत आहे जिल्ह्यातील मोठी ग्रामपंचायत राजकीय दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे असलेल्या डोणगाव जिल्हा परिषद निवडणुकीकडेही राजकीय दिग्गजांचे लक्ष लागले आहे.

आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद निवडणुकीत कोण बाजी मारणार याचा कानोसा घेतला जात असून याबाबत सोशल मीडियावर एक्झिट पोलच्या माध्यमातून उमेदवाराची चाचपणी केली जात आहे. यामध्ये शरदचंद्र पवार गट राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गोपाल सुभाषराव आखाडे यांनी मात्र बाजी मारल्याची दिसून येत असून त्यांना मतदारांची सर्वाधिक पसंती असल्याचे एक्झिट पोलवरून समोर आले आहे.त्यामुळे डोणगाव जिल्हा परिषद निवडणुकीत तुतारी वाजणार असल्याची चर्चा आतापासूनच सुरू झाली आहे.

### जिल्हा परिषद निवडणुकीसाठी अनेकांची तयारी

आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद निवडणुकीसाठी डोणगाव जिल्हा परिषद सर्कलमध्ये निवडणूक लढवण्यासाठी अनेक पक्षाचे पदाधिकारी तथा कार्यकर्ते इच्छुक असून मतदारसंघात त्यांनी अप्रत्यक्षरीत्या प्रचाराला प्रारंभही केला आहे. गावागावात भेटी देणे, लग्न सोहळे, सुखदुःखात सहभागी होऊन जनतेशी संवाद साधणे, त्याचबरोबर छोटे-मोठे धार्मिक कार्यक्रम, क्रीडा कार्यक्रम आदी कार्यक्रमातूनही जनतेसोबत जुळून आतापासूनच अप्रत्यक्षरीत्या निवडणुकीच्या प्रचार कार्याला सुरुवात केली असल्याचे दिसून येत आहे. जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये पक्षाकडून अधिकृत उमेदवारी मिळावी, यासाठी ही प्रयत्न चालवले जात आहे. तर, राजकीय पदाधिकारी उमेदवाराकडे लक्ष देऊन असून जनता कोणाला पसंती देत आहे. याबाबत राजकीय मंडळी कानोसा घेत आहे.सध्या सोशल मीडियावर जिल्हा परिषद सर्कलच्या उमेदवाराबाबत चांगलीच चर्चा सुरू असून यामध्ये मात्र गोपाल आखाडे यांनी बाजी मारली आहे. त्यामुळे इतर इच्छुक उमेदवारांचा मात्र हिरमोड झाला आहे...

आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद निवडणुकीसाठी भाजप, शिवसेना शिंदे गट, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, काँग्रेस, सह पक्षांकडून निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांनी निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्यापूर्वीच छुप्या प्रचाराला प्रारंभ केला आहे. त्यामुळे मतदारसंघात भेटी वाढवल्या असून अप्रत्यक्षरीत्या जिल्हा परिषद निवडणुकीसाठी आपण इच्छुक असल्याचे दाखविले जात आहे.तर, मतदारांच्या मनातील उमेदवार कोण याचा कानोसा घेण्यासाठी राजकीय नेते लक्ष ठेवून आहेत. जिल्ह्यातील महत्त्वाची जिल्हा परिषद असलेल्या डोणगाव जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये अनेक जण इच्छुक असले असून त्यांना उमेदवारांनी अप्रत्यक्षरित्या फिल्डिंग लावणे सुरू केली आहे. याबाबत चर्चेत असलेल्या काही नावांमधील युवा कार्यकर्ते तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक जिल्हाध्यक्ष गोपाल सुभाषराव आखाडे यांना जिल्हा परिषद सर्कल मधील उमेदवारांकडून सर्वाधिक पसंती मिळत असल्याचे चित्र सोशल मीडियावर सुरू असलेल्या एक्झिट पोलवरून दिसून येत आहे.

तर इतर इच्छुक उमेदवारांना मात्र, अत्यल्प मतदारांनी पसंती दाखवल्याचे ही एक्झिट पोल वरच्या आकडेवारी समोर येत आहे.आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे युवा कार्यकर्ते तथा पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्या विश्वासू म्हणून ओळखले जाणारे गोपाल पाटील आखाडे यांना सर्वाधिक पसंती मिळत आहे. त्यामुळे त्यांची बाजू मजबूत असून जिल्हा परिषद निवडणुकीत त्यांची पकड असल्याचे चित्र दिसून येत आहे.मतदारांकडून एक युवा कार्यकर्ता, सामाजिक व राजकीय कार्याची जाण, विकासाचा अजेंडा असलेल्या गोपाल पाटील आखाडे यांच्याकडे भावी जिल्हा परिषद सदस्य म्हणून पाहिले जात आहे. येणाऱ्या निवडणुकीत गोपाल पाटील आखाडे यांना सर्वाधिक पसंती मिळत असल्याचे सोशल मीडियावर सुरू असलेल्या एक्झिट पोलच्या माध्यमातून दिसून येत आहे.नुकत्याच डोणगाव सर्कल जिल्हा परिषद सर्कलच्या उमेदवाराबाबत सोशल मीडियावर घेण्यात आलेल्या एक्झिट पोलच्या राजकीय कानोशाची चांगलीच चर्चा रंगली असल्याचे दिसून येत आहे.



## युवा खेळाडूंची जबरदस्त कामगिरी

इंग्लंड दौऱ्यावर असलेल्या भारतच्या युवा संघाने ५ कसोटी सामन्यांची मालिका २ – २ अशी बरोबरीत सोडवून इतिहास रचला. सोमवारी पाचव्या कसोटीच्या पाचव्या दिवसाचा खेळ सुरू झाला तेव्हा भारतीय संघ इंग्लंडचे उरलेले चार फलंदाज बाद करून ही कसोटी जिंकेल असा विचारही कोणी केला नसेल कारण इंग्लंडला जिंकायला फक्त ३६ धावा हव्या होत्या. इंग्लंडचे उरलेले फलंदाज या धावा सहज करतील आणि मालिका ३ – १ ने जिंकतील असाच सर्वांचा होरा होता. मात्र भारतीय खेळाडूंच्या मनात काहीही करून ही कसोटी जिंकायचीच आणि मालिका बरोबरीत सोडवायची असा विश्वास होता आणि या विश्वासाच्या जोरावरच भारताने ही कसोटी अवघ्या सहा धावांनी जिंकली आणि सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. भारताचा हा विजय म्हणजे चमत्कारच म्हणावा लागेल अर्थात चमत्कार करण्याची देखील कला असावी लागते ही कला भारतीय खेळाडूंनी साध्य केली आणि साहेबांना त्यांच्या देशातच लोळविले. ही मालिका बरोबरीत सुटली असली तरी एकप्रकारे भारताचा हा विजयच आहे कारण भारतीय संघ जेव्हा ही मालिका खेळण्यासाठी इंग्लंडच्या भूमीवर उतरला तेव्हा त्यांच्या स्वागताला कोणी हजर नव्हते. सराव सत्रालाही गर्दी नव्हती कारण सर्वांच्या मते इंग्लडच्या बलाढ्य आणि अनुभवी संघापुढे भारताचा युवा आणि अननुभवी संघ टिकणार नाही. इंग्लडच्या अनेक दिग्गज माजी खेळाडू इंग्लड ही मालिका ४ – १ किंवा ५ – ० अशी जिंकेल असे छातीठोकपणे सांगत होते अर्थात त्याला कारणही तसेच होते रोहित शर्मा, विराट कोहली, रविचंद्रन अश्विन या भारताच्या माजी खेळाडूंनी निवृत्ती घेतली होती तर पुजारा, रहाणे, मोहम्मद शमी यासारख्या अनुभवी खेळाडूंना या मालिकेत वगळण्यात आले होते. बुमरा, के एल राहुल, जडेजा आणि पंत वगळता सर्वच खेळाडू नवखे होते. या मालिकेसाठी शुभमन गिल या युवा खेळाडूची निवड करण्यात आली होती. बुमरा आणि पंत हे जरी अनुभवी असले तरी ते पूर्ण पाच कसोटी खेळणार नव्हते त्यामुळे ही मालिका इंग्लंड सहज जिंकेल असा कयास लावला जात होता मात्र भारताच्या युवा खेळाडूंनी जबरदस्त कामगिरी करून हा कयास फोल ठरवला. मालिकेच्या पहिल्या कसोटीतच भारताच्या खेळाडूंनी जबरदस्त कामगिरी करत इंग्लंडला इशारा दिला. वास्तविक पहिलीच कसोटी भारताने जिंकली असती पण मोक्याच्या क्षणी झेल सोडल्याने ही कसोटी इंग्लंडला जिंकता आली. दुसऱ्या कसोटीत मात्र भारताने पलटवार करत इंग्लडला तब्बल ३३६ धावांनी नामोहरण केले. तिसरी कसोटीही भारतानेच जिंकली असती मात्र नशीब बलवत्तर होते म्हणून इंग्लडला ही कसोटी अवघ्या २२ धावांनी जिंकता आली. चौथ्या कसोटीत मात्र दोन्ही संघाने तोडीस तोड कामगिरी केल्याने ती कसोटी अनिर्णित राहिली. पाचव्या कसोटीत पुन्हा भारताने जबरदस्त कामगिरी करत विजय मिळवला आणि मालिका बरोबरीत सोडवली. ज्या संघाचा मानहानीकारक पराभव होईल असा अंदाज होता त्याच संघाने मालिका बरोबरीत सोडवत इतिहास घडवला. भारतीय संघाच्या या ऐतिहासिक यशाचे जितके कौतुक करावे तितके कमी आहे. भारताच्या युवा खेळाडूंकडे अनुभवाची कमतरता असली जिंकण्याचा विश्वास होता याच विश्वासाच्या बळावर भारताच्या या युवा संघाने ही कामगिरी केली. भारताच्या युवा खेळाडूंनी फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही आघाडीवर नेत्रदिपक कामगिरी केली. कर्णधार शुभमन गिल, के एल राहुल, यशस्वी जयस्वाल, ऋषभ पंत या खेळाडूंनी संपूर्ण मालिकेत धडाकेबाज फलंदाजी करून इंग्लंडची गोलंदाजी नेस्तनाबूत केली. कर्णधार शुभमन गिलने संपूर्ण मालिकेत सर्वाधिक ७५४ धावा काढून विक्रमी कामगिरी केली. तर के एल राहुलने ५३२ धावा काढल्या. ऋषभ पंत आणि यशस्वी जयस्वाल यांनी ४०० पेक्षा अधिक धावा काढल्या. भारताच्या या युवा फलंदाजांची ही कामगिरी हेवा वाटावी अशीच आहे. या खेळाडूंनी खोऱ्याने धावा काढल्याने मालिका बरोबरीत सोडवण्यास मोठी मदत झाली. गोलंदाजीतही भारतीय गोलंदाजांनी कमाल केली. बुमरा, सिराज आणि प्रसिद्ध कृष्णा, आकाश दीप या वेगवान गोलंदाजांनी कमाल करत इंग्लडच्या फलंदाजांचे कंबरडे मोडले. मोहम्मद सिराजने मालिकेत सर्वाधिक २३ बळी घेतले. बुमरा आणि प्रसिद्ध कृष्णा या तिघांनी ३ कसोटी खेळले आणि त्यांनी प्रत्येकी १४ बळी घेतले. तर आकाशदीपनेही ३ कसोटीत १३ बळी घेतले शिवाय शेवटच्या कसोटीत नाईट वाचमन म्हणून मोक्याच्या क्षणी अर्धशतक झळकावले. मोहम्मद सिराजने तर या मालिकेत अप्रतिम कामगिरी केली. रवींद्र जडेजाने या मालिकेत अष्टपैलू खेळ केला. रवींद्र जडेजाने या मालिकेत ५०० पेक्षा जास्त धावा काढल्या आणि मोक्याच्या क्षणी ७ बळी घेतले. एकूणच भारताच्या खेळाडूंनी फलंदाजी आणि गोलंदाजीत अप्रतिम कामगिरी केली. भारताचा नवा कर्णधार शुभमन गिलने संघाचे नेतृत्व कुशलतेने केले. कर्णधार म्हणून पहिलीच मालिका खेळत असतानाही तो कुठेही गांगरलेला वाटला नाही उलट मोक्याच्या क्षणी डोके शांत ठेवून व्यूहरचना रचत त्याने आपल्यातील नेतृत्वगुण दाखवून दिले. कर्णधारपदावर झालेली आपली निवड सार्थ ठरवत त्याने ही मालिका बरोबरीत सोडवली. कर्णधार असूनही त्याने आपल्या फलंदाजीवर परिणाम होऊ दिला नाही उलट कर्णधार झाल्यावर त्याची बॅट आणखी तळपली. त्याने या मालिकेत सर्वाधिक ७५४ धावा काढून कर्णधार म्हणून एका मालिकेत सर्वाधिक धावा काढण्याचा विक्रम केला. त्याने या मालिकेत ४ शतके झळकावली. तोच या मालिकेचा मालिकावीर ठरला एकूणच भारताच्या या युवा खेळाडूंनी जबरदस्त कामगिरी करून ही मालिका बरोबरीत सोडवली. भारताच्या या नव्या युवा संघाची ही कामगिरी कौतुकास्पदच नाही तर अभिमानास्पद आहे. इंग्लड विरुद्धची कसोटी मालिका बरोबरीत सोडवणाऱ्या भारतीय संघाचे मनापासून अभिनंदन! चक दे इंडिया!!

# शहरातील नागरीकांनी अवयवदानासाठी पुढाकार घेण्याचे मनपाचे आवाहन

**दैनिक आपला विदर्भ**

### अंगदान–जीवन संजीवनी अभियान पंधरवडा






**चंद्रपूर/प्रतिनिधी :** चंद्रपूर शहर महानगरपालिकेतर्फे ''अंगदान जीवन संजीवनी अभियान पंधरवडा'' दिनांक ३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२५ दरम्यान राबविला जात आहे.. या अभियानाचा उद्देश नागरिकांमध्ये अंगदानाविषयी जागृती निर्माण करणे, गैरसमज दूर करणे आणि अधिकाधिक लोकांना अंगदानासाठी प्रोत्साहित करणे हा आहे.

समाजाभिमुख उपक्रम राबवण्याच्या दृष्टीने मनपा आरोग्य विभागामार्फत अवयवदानबाबत मार्गदर्शन कार्यक्रम राबविण्यात येत आहे ५ ऑगस्ट रोजी मनपा सभागृहात यासंबंधी मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. डॉ. नयना उत्तरवार यांनी या संदर्भात सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. याप्रसंगी सर्व उपस्थितांनी अवयवदानाची शपथ घेतली.अवयवदान हे ''मरणोत्तर दान'' म्हणून याला सर्वोच्च मानले जाते. एका व्यक्तीच्या अंगदानामुळे ८ लोकांचे प्राण वाचू शकतात,अंगदान सुरक्षित, वैद्यकीय दृष्ट्या नियंत्रित आणि कायदेशीर प्रक्रिया आहे.अंगदानामुळे दात्याच्या शरीराचा अपमान होत नाही; सन्मानपूर्वक सर्व प्रक्रिया पार पाडली जाते. अंगदानाच्या एका निर्णयामुळे अनेक कुटुंबांना आशा, आनंद आणि नवे भविष्य मिळू शकते.

डोळे, हृदय, मूत्रपिंड, यकृत, फुफ्फुसे, स्वादुपिंड इ. अवयवांचे प्रत्यारोपण करून रुग्णांना नवे जीवन मिळते. काही अवयव (जसे की किडनी) प्रत्यारोपणामुळे रुग्णाला वर्षानुवर्षे चालणाऱ्या डायलिसिसपासून मुक्ती मिळते. कॉर्निया प्रत्यारोपणामुळे अंध व्यक्तीला पुन्हा दृष्टी मिळू शकते. एका अर्थाने मृत्यूनंतरही आपण समाजासाठी कार्य करू शकतो.

सदर कार्यक्रमाच्या मार्गदर्शन व जनजागृती प्रसंगी उपायुक्त मंगेश खवले, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नयना उत्तरवार,नगरसचिव नरेंद्र बोबाटे,सहायक आयुक्त संतोष गर्गेलवार,डॉ. अमोल शेळके,उपअभियंता रवींद्र कळंबे,उपअभियंता प्रगती भुरे,सोनू थुल,अमित फुलझेले,सागर सिडाम,डॉ. नरेंद्र जनबंधू तसेच अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**अवयवदानासाठी कुठे संपर्क साधावा**

अवयवदान संकल्प अणि ऑनलाईन प्रतिज्ञा संदर्भात अधिक माहीतीसाठी नॅशनल ऑर्गन अँड टिश्यू ट्रान्सप्लांट ऑर्गनायझेशन (NOTTO) च्या www.notto.abdm.gov.in या संकेतस्थळावरील वेब पोर्टलच्या माध्यमातुन ऑनलाईन प्रतिज्ञेद्वारे नोंदणी करावी. अधिक माहीतीसाठी NOTTO च्या कॉल सेंटरशी टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक १८००-११-४७७० यावर किंवा चंद्रपूर महानगरपालिका आरोग्य विभाग येथे संपर्क साधावा.

''अंगदानाविषयीचे गैरसमज बाजूला ठेवून, मृत्यूनंतर आपल्या अवयवांचे दान करण्याचा संकल्प करा. आपल्या एका निर्णयामुळे अनेक कुटुंबांना आशेचा किरण मिळू शकतो.''

**– विपीन पालीवाल,आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका.**

# मालेगाव मंडळा अंतर्गत लाभार्थ्यांना विविध दाखल्यांचे वाटप

**दैनिक आपला विदर्भ**



**मालेगार्व/प्रतिनिधी :** तहसील अंतर्गत येणाऱ्या मालेगाव मंडळामार्फत ४ ऑगस्ट रोजी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज महाराज समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये मालेगाव मंडळ अंतर्गत येणारे पंधरा गावातील शेतकरी तसेच लाभार्थ्यांना महसूल विभागांतर्गत तसेच इतर विभागातील कागदपत्रांचा वाटप करण्यात आला.

या प्रसंगी महसूल विभागाचे नायब तसहीलदार अरविंद करंगळे, मालेगाव मंडळ अधिकारी नागेशराव घुगे, मंडळातील येणाऱ्या गावातील ग्राम महसूल अधिकारी जगन महाले, येल्लारे, अमोल पांडे, दत्तराव घुगे, साठे, राऊत तसेच सामाजिक कार्यकर्ते अनिल जाधव, महादेव वानखेडे उपसरपंच इराळा, दीपक लहाने, इतर अधिकाऱ्याच्या उपस्थितीमध्ये मंडळामधील लाभार्थ्यांना विविध प्रकारचे कागदपत्रांचा वाटप करण्यात आले. या अभियानामध्ये मालेगाव तहसील विभागातील संजय गांधी विभाग पुरवठा विभाग एक खिडकी विभाग निवडणूक विभाग नगरपंचायत वन विभाग महाराष्ट्र राज्य वितरण कंपनी आरोग्य विभाग महिला आर्थिक विकास मंडळ चे कर्मचारी उपस्थित होते. यावेळी आरोग्य विभागामार्फत लाभार्थ्यांचे आरोग्याची तपासणी ही सुद्धा करण्यात आली तसेच उत्पन्न दाखले जातीचे दाखले सातबारा आठ नकला विविध कागदपत्रे चा वाटप करण्यात आला. तसेच सर्व योजनेची माहिती सुद्धा याप्रसंगी लाभार्थ्यांना नायब तहसीलदार महसूल विभागाचे करांगळे यांनी उपस्थित त्यांना दिली. अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते अनिल जाधव यांनी दिली.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या उपकेंद्रांच्या धोरणाबाबत सुधारित आराखडा तयार करावा : उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील

**दैनिक आपला विदर्भ**



**मुंबई/प्रतिनिधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे अंतर्गत उपकेंद्राकरिता सार्वजनिक विद्यापीठात प्रत्येक ठिकाणी पाच एकर जागा देण्यासंबंधी केलेली कार्यवाही तसेच ज्या ठिकाणी उपकेंद्राकरिता जागा मिळाली आहे त्याचे भाडे किंवा तत्सम धोरणासंबंधीचा सुधारित आराखडा तयार करावा, असे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले. मंत्रालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या विविध प्रश्नांबाबत आयोजित आढावा बैठकीत उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पाटील बोलत होते. या बैठकीला उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी.वेणुगोपाल रेड्डी, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, तंत्र शिक्षण विभागाचे संचालक डॉ.विनोद मोहितकर, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ संचालक डॉ. प्रमोद नाईक, उच्च शिक्षण विभागाचे उपसचिव अशोक मांडे, उपसचिव प्रताप लुबाळ, सहसचिव संतोष खोरगडे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.कारभारी काळे व संबंधित अधिकारी उपस्थित होते. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या अधिष्ठाता, संचालक व सहसंचालक पदाची बिंदूनामावली तपासणी आणि शिक्षकेतर पदांचा आकृतीबंध व पदभरती बाबतची कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण करावी, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठात सार्वजनिक बांधकाम अधिकाऱ्याची तात्काळ नियुक्ती करण्यासंदर्भात सुचना देऊन तसेच विद्यापीठाच्या प्रशासकीय व शैक्षणिक कामकाजाकरिता शासनामार्फत दोन विशेष कार्य अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यापीठातील पायभूत सोयीसुविधांकरिता भरीव निधी शासनामार्फत उपलब्ध करण्यात येऊन पहिल्या टप्यात मुलांसाठी वर्ग खोल्या, अत्याधुनिक लॅब उभारण्यात येणार असल्याचे पाटील यांनी यावेळी सांगितले. तसेच अध्यापकांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मंजूर करण्याबाबत, प्रकल्पग्रस्तांच्या विविध समस्या संबंधित तसेच विद्यापीठातील पायाभूत सुविधा, बांधकामे, अनुदान आणि विद्यापीठाचे लेखा परीक्षण करण्याबाबत सविस्तर आढावा यावेळी घेण्यात आला.

## कॉमेडी किंग भाऊ कदम झाला सिरियल किलर?

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** लोकप्रिय कॉमेडी वीर अभिनेता भाऊ कदमला कोणत्याही ओळखीची गरज नाही. भाऊ कदम आणि विनोद हे समीकरण पक्क आहे. नेहमीच सगळ्यांना खळखळून हसवणारा हाच भाऊ कदम आता शार्प शूटर सिरियल किलर ठरला आहे. तुम्हालाही हे वाचून धक्का बसला ना... तर त्याचं आहे असं की भाऊ कदम काय खरंच शार्प शूटर सिरियल किलर झाला नाही तर तो सिरियल किलर या नाटकातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

अद्वैत थिएटर्स आणि सिंधु संकल्प एन्टरटेनमेंट प्रा. लि. प्रस्तुत, राहूल भंडारे आणि प्रणय तेली निर्मित आणि केदार देसाई लिखित दिग्दर्शित 'सिरियल किलर' हे धमाल नाटक लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. यात भाऊ कदम यांची मध्यवर्ती भूमिका असून त्यांच्या जोडीला अभिनेत्री अश्विनी कुलकर्णी, श्रद्धा हांडे,तेजस पिंगुळकर या नाटकात धमाल उडवणार आहेत. येत्या शनिवारी म्हणजेच १२ ऑक्टोबरला रंगभूमीवर दाखल होत आहे.

मालिका अभिनेत्री आणि रिपोर्टर यांच्यामध्ये घडलेल्या घटनेने संशयाचे सुरुंग पेरले जातात. या घटनेनंतर सिरियल किलर म्हणून आलेला खरंच सिरियल किलर असतो की नसतो? याचा धमाल खेळ रंगतो आणि तो किती गमतीशीर असणार हे पाहण्यासाठी सगळेच उत्सुक आहेत. फुल टू कॉमेडीच्या रॅपरमध्ये गुंडाळून आलेला सिरियल किलर काय धमाल उडवतो हे पाहणं रंजक ठरणार आहे.

'बेभान कॉमेडी आणि निखळ आनंदासोबतच आमच्या सगळ्यांच्या भन्नाट ट्यूनिंगची ट्रीट देणारं सिरियल किलर' हे नाटक प्रेक्षकांना निखळ आनंद देईल' असा विश्वास अभिनेते भाऊ कदम यांनी व्यक्त केला आहे. 'नाट्यरसिकांना नेहमी काहीतरी वेगळं देण्याचा प्रयत्न अद्वैत थिएटर्सने केला आहे. 'सिरियल किलर' च्या माध्यमातूनही आम्ही सस्पेंस धमाल अशी नाट्यकृती आणली असून भाऊ कदमच्या चाहत्यांसाठी हे नाटक मनोरंजनाची दिलखुलास पर्वणी असणार आहे'. नाटकाचे नेपथ्य प्रदीप मुळ्ये यांचे आहे तर संगीत विजय गवंडे यांचे आहे. प्रकाशयोजना श्याम चव्हाण यांची आहे. सूत्रधार सुनील पानकर गोट्या सावंत आहेत.

# समृद्धी महामार्ग आणि वाढवण बंदराला जोडणाऱ्या फ्रेट कॉरिडॉरला मंजुरी

## मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्त्वाचा निर्णय

**दैनिक आपला विदर्भ**



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य मंत्रिमंडळाची बैठक मंगळवारी (५ ऑगस्ट) पार पडली. दरम्यान, महाराष्ट्राची भाग्यरेषा म्हणून ओळखला जाणारा समृद्धी महामार्ग वाढवण बंदराला जोडण्याचा मार्ग अखेर मोकळा झालाय. वाढवण बंदर (तवा) ते हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग (भरवीर) यांना जोडणाऱ्या फ्रेट कॉरिडॉरला मंगळवारी मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आलीय. याशिवाय, अन्य सहा महत्त्वाचे निर्णय या बैठकीत घेण्यात आलेत.

समृद्धी महामार्ग वाढवण बंदराशी जोडला जाणार : समृद्धी महामार्गामुळं विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रासह राज्यातील २४ जिल्हे जेएनपीटी बंदराशी जोडले गेलेत. आता हा महामार्ग वाढवण बंदराशी जोडला जाईल. ७०१ किलोमीटर लांबीच्या या महामार्गासाठी ५५ हजार ३३५ कोटी रुपयांचा खर्च झाला आहे. समृद्धी महामार्गाचा ७६ किलोमीटर मार्ग नाशिक आणि ठाणे जिल्ह्यातून जातोय. या भागात सह्याद्रीच्या डोंगर रांगा असून अतिशय खडतर भौगोलिक परिस्थितीत मार्ग काढत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळानं हे अभियांत्रिकी आव्हान पेललं आहे. यातील इगतपुरीजवळील बोगदा हा ८ किलोमीटर लांबीचा असून तो राज्यातील सर्वाधिक लांबीचा आणि देशातील सर्वाधिक रुंदीचा बोगदा आहे.

मंत्रिमंडळ बैठकीतील महत्त्वाचे निर्णय...

महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि नाविन्यता धोरणाला (२०२५) मंजुरी

राज्य शासनाच्या छोट्या, चिंचोळ्या आकाराच्या, बांधकामास अयोग्य, उपयुक्त आकार नसलेल्या, सुलभ पोहोच मार्ग नसलेल्या किंवा लॅण्ड लॉक्ड स्वरुपातील भूखंडांच्या वितरण धोरणास मंजुरी.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अतिरिक्त जमिनींचा व्यापारी तत्वावर वापर. सुधारित धोरणास मंजुरी.

नागपूर विणकर सहकारी सूतगिरणीच्या १ हजार १२४ कामगारांना ५० कोटींचे सानुग्रह अनुदान मिळणार. सुतगिरणीच्या जमीन विक्रीतून निधीची तरतूद.

जळगांव जिल्ह्यातील मौजे पाचोरा येथील भुखंडावरील क्रींडागणाचे आरक्षण वगळून, त्याचा रहिवास क्षेत्रात समावेश करण्यास मान्यता.

कुष्ठरुग्णांसाठी कार्यरत स्वयंसेवी सस्थांच्या अनुदानात वाढ, अनुदान २ हजारांवरून ६ हजार करण्यास मान्यता.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### राष्ट्रवादी अजित पवार पक्षाच्या जिल्हाध्यक्षाचा कारनामा, आमदार नसतानाही गाडीवर आमदार लोगो असणार चित्र

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** अजित पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांच्या गाडीवर आमदार असणारा लोगो लावल्याचा प्रकार समोर आला. आमदार नसतानाही गाडीवर आमदाराचा लोगो लावल्याने सोलापुर जिल्ह्यात चर्चेचा आले उधाण आले आहे. उमेश पाटील यांच्या एम.एच. ०४ एच. डी. ५५६५ या नंबरच्या गाडीवर सोलापुरातील विश्रामगृह येथे आमदाराचा लोगो असल्याचे दिसून आले महाराष्ट्रातील २८८ विधानसभा सदस्य आणि ७८ विधान परिषद सदस्यांना शासकीय कामासाठी गाडीवर आमदाराचा लोगो लावण्याचा अधिकार आहे. मात्र, जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी स्वतःच गाडीवर लोगो लावून मला आमदार झाल्यासारखं वाटतंय असं म्हणण्याची वेळ आली आहे.

### बिहार मतदार यादीत दावे-हरकती सादर करण्यासाठी निवडणूक आयोगाचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बिहारच्या अंतिम मतदार याद्यांमध्ये पात्र मतदार वगळला जाणार नाही आणि अपात्र मतदाराचा समावेश होणार नाही, याची खात्री करण्यासाठी निवडणूक आयोगाने पुन्हा एकदा जनतेला तसेच राजकीय पक्षांना आवाहन केले आहे. १ ऑगस्ट रोजी जाहीर झालेल्या मसुदा मतदार यादीतील त्रुटी दुरुस्त करण्यासाठी दावा व हरकती ५ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत सादर करता येतात. मात्र, आजपर्यंत एकाही राजकीय पक्षाने कोणताही दावा किंवा हरकत नोंदवलेली नाही.राजकीय पक्षांकडून मिळालेल्या माहितीनुसार, राष्ट्रीय पक्ष व राज्य पक्षांकडून एकूण १,६०,८१३ बीएलए फॉर्म मिळाले असून त्यातील एकाही प्रकरणावर अद्याप निकाली कार्यवाही झालेली नाही.याशिवाय, थेट मतदारांकडून पात्र मतदारांचा समावेश व अपात्र नावे वगळण्यासाठी २,८६४ अर्ज मिळाले आहेत, तसेच १८ वर्षे पूर्ण केलेल्या नव्या मतदारांकडून फॉर्म-६ सह १४,९१४ अर्ज प्राप्त झाले आहेत. यापैकी कोणताही अर्ज अद्याप निकाली काढलेला नाही.नियमांनुसार, सर्व दावे-हरकती संबंधित ईआरओ/एईआरओ कडून सात दिवसांनंतर निकाली काढल्या जातील. तसेच १ ऑगस्टला प्रसिद्ध झालेल्या मसुदा यादीनंतर कोणतेही नाव केवळ तपासणी करून आणि संबंधित व्यक्तीस न्याय्य संधी दिल्यानंतरच वगळले जाऊ शकते, असे भारत निवडणूक आयोगाने एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### जम्मू - कश्मीर मधील सिंदूर महारक्तदान शिबिरासाठी 1 हजार तरुण विशेष रेल्वेने रवाना; मंत्री उदय सामंतांनी दाखवला झेंडा



दैनिक आपला विदर्भ

**सांगली/प्रतिनिधी :** देशाच्या जवानांच्यासाठी जम्मू कश्मीर मध्ये पार पडणाऱ्या सिंदूर महारक्तदान शिबिरासाठी सांगलीतून धर्मवीर एक्स्प्रेस विशेष रेल्वे रवाना झाली आहे. उद्योग मंत्री उदय सामंत आणि शिवप्रतिष्ठानचे संस्थापक संभाजी भिडे यांच्या हस्ते यावेळी विशेष रेल्वेला झेंडा दाखवण्यात आला. १ हजार तरुण ९ ऑगस्ट रोजी जम्मू कश्मीर मध्ये मुख्यमंत्री एकनाथ महाराज शिंदे यांच्या उपस्थितीत पार पडणाऱ्या सिंदूर महारक्तदान शिबिरामध्ये सहभागी होण्यासाठी रवाना झाले आहेत. शिवसेना शिंदे गटाचे नेते व डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांच्या माध्यमातून सिंदूर रक्तदान शिबिराचा आयोजन थेट जम्मू - काश्मीरमध्ये करण्यात आले आहे.

### सिंचन प्रकल्पाची कामे गतीने कालमर्यादेत करा : जलसंपदा मंत्री गिरीश महाजन

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात सिंचनाचे क्षेत्र वाढावे, शेतीला शाश्वत पाणी उपलब्ध व्हावे यासाठी बांधकामाधीन प्रकल्पांची कामे गतीने व कालमर्यादेत पूर्ण करावीत, अशा सूचना जलसंपदा ( विदर्भ, तापी, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ) व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी दिल्या. मंत्रालयात जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या अध्यक्षतेखाली विदर्भ, तापी आणि कोकण पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाच्या बैठका झाल्या. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीस जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, सचिव संजय बेलसरे, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळचे कार्यकारी संचालक राजेश सोनटक्के, तापी पाटबंधारे विकास महामंडळचे कार्यकारी संचालक ज. द. बोरकर, कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले यांच्यासह जलसंपदा विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.नियामक मंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आलेल्या कामामुळे सिंचन क्षेत्र वाढणार आहे. त्यानुसार या कामांचे सूक्ष्म नियोजन करून त्यानुसार कामास प्राधान्य द्यावे. याबरोबरच विभागाने पाणी पट्टी वसुलीसाठी सूक्ष्म नियोजन करून त्यानुसार कार्यवाही करावी, अशा सूचनाही जलसंपदा मंत्री श्री. महाजन यांनी यावेळी दिल्या.विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाच्या ८७ व्या बैठकीत ४२ विषयांवर, तापी पाटबंधारे विकास मंडळाच्या नियामक मंडळाच्या ७१ व्या बैठकीत २५ विषयांवर, आणि कोकण पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाच्या ८८ व्या बैठकीत १८ विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

# मराठी सिनेमांना मल्टीप्लेक्समध्ये अतिरिक्त 'शोज' मिळवून देण्यासाठी समिती स्थापन : उपमुख्यमंत्री शिंदे यांची घोषणा

## मराठी सिनेमा जगविण्यासाठी आणि वाढवण्यासाठी सुचवणार उपाययोजना

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** मराठी सिनेमांना मल्टीप्लेक्समध्ये अतिरिक्त शोज मिळवून देण्यासह या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी शासन स्तरावर समिती स्थापन करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. समितीने दीड महिन्यात शासनाला अहवाल सादर करावा, मराठी सिनेमा जगला पाहिजे,अशी राज्य शासनाची भूमिका असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

मराठी सिनेमांना मल्टिप्लेक्स मध्ये मिळणाऱ्या कमी स्क्रीन, तसेच त्यांना कोणतीही माहिती न देता तीन दिवसात सिनेमा थिएटरमधून उतरवणे, आठवड्याभराचे शुल्क घेऊन उर्वरित रक्कम परत न करणे, तसेच सेन्सॉर बोर्डाकडून मराठी सिनेमांना सेन्सॉर संमती, मराठी सिनेमाच्या खेळांच्या वेळा ऐनवेळी बदलणे अथवा रद्द करणे यासारख्या अनेक प्रश्नांबाबत मराठी सिनेमांचे निर्माते, वितरक आणि विविध पक्षांच्या सिने कर्मचारी संघटनांसमवेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने मंत्रालयात बैठक झाली.

यावेळी सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार,वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, वित्त राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल, गृहराज्यमंत्री योगेश कदम, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नविन सोना, नगरविकास प्रधान सचिव डी. गोविंदराज, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव किरण कुलकर्णी आणि इतर विभागांचे अधिकारी, मनसे चित्रपट सेनेचे अमेय खोपकर, शिवसेना चित्रपट सेनेचे सुशांत शेलार, राष्ट्रवादी चित्रपट सेनेचे बाबासाहेब पाटील, व्हिडीओ पॅलेसचे नानूभाई जयसिंघानी, वितरक समीर दीक्षित, चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले,संदीप घुगे हेदेखील उपस्थित होते.

यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी निर्माते, वितरक, मल्टीप्लेक्स मालक यांचे म्हणणे जाणून घेतले. तसेच मराठी सिनेमाला प्रोत्साहन देण्याचे शासनाचे धोरण असून मराठी सिनेनिर्माता जगला तरच मराठी सिनेमाला चांगले दिवस येणार आहेत. त्यामुळे या प्रश्नावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला असून या समितीचे अध्यक्ष गृह विभागाचे अपर मुख्य सचिव असून समितीत प्रधान सचिव अपील आणि सुरक्षा, प्रधान सचिव नगरविकास २, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव, परिवहन सचिव, मराठी सिनेमांचे निर्माते, वितरक, मल्टिप्लेक्स मालक,फिल्मसिटी अधिकारी, चित्रपट महामंडळाचे प्रतिनिधी, निर्माते महामंडळाचे प्रतिनिधी यांचा समावेश असेल. समिती येत्या दीड महिन्यात आपला अहवाल शासनाला सादर करणार असून, त्यानंतर याबाबत शासन अंतिम निर्णय घेईल असे उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

## मनपाद्वारे गणेशोत्सव विविध परवानगीसाठी एक खिडकी प्रणाली सुरु

### मदतकक्षाद्वारेही करण्यात येते मदत https://pandal.cmcchandrapur.com येथे भेट देऊन करता येतो ऑनलाईन अर्ज

दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे गणेशोत्सवाप्रसंगी सार्वजनीक गणेश मंडळांना लागणाऱ्या विविध परवानग्या या एकाच ठिकाणाहुन मिळाव्या यासाठी एक खिडकी प्रणाली सुरु करण्यात आली असुन मनपा मुख्य इमारत येथे गणेश मंडळांसाठी मदतकक्षसुद्धा सुरु करण्यात आला आहे.

येत्या २७ ऑगस्टपासुन शहरात दहा दिवस गणेशोत्सव साजरा होणार आहे. गणेश मंडळांना महापालिका व इतर विभागाकडून रीतसर परवानग्या या घ्याव्या लागतात. पोलीस स्टेशन, ट्राफिक पोलीस स्टेशन,सार्वजनिक बांधकाम, अग्निशमन, महावितरण केंद्र, महानगरपालिका इत्यादी विभागाच्या परवानगी या एकच ठिकाणाहुन घेता याव्या यासाठी एक खिडकी प्रणाली चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे सुरु करण्यात आली आहे.

गणेश मंडळांना अर्ज करणे सोपे जावे याकरीता महानगरपालिका कार्यालयात एकल खिडकी प्रणाली मदतकक्ष सुद्धा स्थापन करण्यात आला आहे. : https://pandal.cmcchandrapur.com या लिंकद्वारे ऑनलाईन अर्ज सादर करता येऊ शकतो. गणेशोत्सव प्रदुषणमुक्त होण्याच्या दृष्टीने पीओपी मुर्तींना थारा न देता शाडूच्या मुर्तींचाच वापर करण्याचे आवाहन चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

## ठाणेदार साहेब! आमच्या गावची दारू बंदी करा हो!

### मुरली येथील सर्व गावकऱ्यांची मागणी



दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** मुरली व मुरली तांडा, येथे देशी विदेशी तसेच मोहाची गावठी दारूची विक्री खुलेआम मोठ्या प्रमाणात चालु असून गावात दारूचा अक्षरश: महापूर आला आहे. गावात २४ तास दारूची विक्री होत असल्यामुळे तरुण पिढी व्यसनाधीन झाली आहे. तसेच अनेक महिलांचा संसार उद्ध्वस्त होत आहे. दारूमुळे गावातील शांतता व सुव्यवस्था धोक्यात सापडली असून, गावातील भांडणांचे प्रमाण वाढले आहे. या दारूमुळे गावातील महिलाना दारू पिणाऱ्या पतीकडून खुप त्रास व मारहाण होत आहे.तसेच शाळा हे ज्ञानाचा मंदिर असून या शाळेत दारुडे दारू पिऊन रिकाम्या बाटल्या तिथेच फेकत असून मुलानवर वाईट परिणाम पडत आहे त्यामुळे गावातील दारू कायमस्वरूपी बंद करून विक्रेत्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी मुरली येथिल सर्व गावकरीयांनी बिटरगाव ठाणेदार पांडुरंग शिंदे यांना केली आहे. यावेळी युवराज भिकू जाधव,रमेश राठोड नाईक, संजय बन्सी राठोड,शंकर उनळे, बबलू चव्हाण,इंदल राठाड,डि एस राठोड,राहुल गौतम कांबळे व वसंता बळीराम राठोड उपस्थित होते.

## महाराष्ट्र जीएसटी विभागामार्फत बनावट इनपुट टॅक्स क्रेडिटचा गैरवापर व करचोरी प्रकरणी एक व्यक्ती अटकेत

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (जीएसटी) विभागाने विनय राजेश पारेख (वय ३७ वर्षे) रा. ए-४०२, कुंज पॅराडाईस, आयआयसीआय बँकेच्या समोर, बडोदा, गुजरात ३९०००२ यास २९.८८ कोटी रुपये इतक्या किंमतीचा बनावट इनपुट टॅक्स क्रेडिट (आयटीसी) घेऊन करचोरी केल्याप्रकरणी अटक केली आहे. सदर अटक मेसर्स ॲन्जल प्लाय ॲन्ड लॅम या फर्म मध्ये करण्यात येत असलेल्या पुढील तपासाचा एक भाग आहे. विभागाने अशा करचोरी करणाऱ्या करदात्यांविरोधात विशेष मोहीम हाती घेतली आहे, जे वस्तू किंवा सेवा प्रत्यक्ष न पुरवता बनावट बिले तयार करून आयटीसीचा अवैध लाभ घेत आहेत. हे महाराष्ट्र/केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम २०१७ अंतर्गत गंभीर स्वरूपाचे उल्लंघन आहे.विनय राजेश पारेख हे मेसर्स ॲन्जल प्लाय ॲन्ड लॅम या फर्मचे प्रोप्रायटर असून या फर्ममार्फत सुमारे २९.८८ कोटींची बनावट इनपुट टॅक्स क्रेडिट घेतला असून आरोपी विनय राजेश पारेख याला अटक करून मा. न्यायदंडाधिकारी एस्प्लेनेड कोर्ट यांच्यासमोर हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्यास १८ ऑगस्ट २०२५ पर्यंत न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. सदर कारवाई ही सहाय्यक राज्यकर आयुक्त (डी-३१३) नितीनचंद्र ग. पाटील व सहाय्यक राज्यकर आयुक्त (डी-३१५) रमेश उ. अवघडे यांच्या नेतृत्वाखाली, डीसी-ई-०३०३ यूनिटच्या राज्यकर निरीक्षकांसह पार पाडण्यात आली.महाराष्ट्र जीएसटी विभागाने बनावट इनपुट टॅक्स क्रेडिट प्रकरणांवर कठोर कारवाई करण्याचा निर्धार पुन्हा एकदा अधोरेखित केला आहे. राज्यकर विभाग सर्व करदात्यांना जीएसटी कायद्यांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन करतो आणि कोणत्याही प्रकारच्या करचोरीपासून दूर राहण्याची ताकीद देतो. बनावट व्यवहार करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई सुरूच राहील, असे प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## जिल्हा रुग्णालयात अवयवदान पंधरवड्याला सुरुवात

### अवयवदान जनजागृती रॅलीला उत्सफूर्त प्रतिसाद

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हा सामान्य रुग्णालय येथे ३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत अवयवदान जनजागृती पंधरवडा राबविण्यास सुरुवात झाली असून भव्य रॅलीने या पंधरवड्याचा उत्साहात प्रारंभ करण्यात आला. ''अंगदान जीवन संजीवनी'' या अभियानांतर्गत आयोजित या रॅलीस शहरवासीयांचा उत्सफूर्त प्रतिसाद लाभला.

या उपक्रमाचे आयोजन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. अवयवदानाविषयी समाजात जनजागृती निर्माण व्हावी, अंगदानाच्या महत्त्वाविषयी नागरिकांमध्ये समज वाढावी व गैरसमज दूर व्हावेत, या उद्देशाने ही रॅली काढण्यात आली होती. अवयवदान जनजागृती पंधरवड्यात हृदय, यकृत, मूत्रपिंड, फुफ्फुसे, डोळे, ऊती यांसारख्या अवयवांचे दान हे दुसऱ्याचे जीवन वाचवू शकते, ''अवयवदान हे सर्वश्रेष्ठ दान'' या उद्देशाने सर्व नागरिकांनी अवयवदानासाठी संमती फॉर्म भरुन अवयवदान करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमात उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना अंगदानाची शपथ देण्यात आली. रॅलीमध्ये जिल्हा रुग्णालयातील नर्सिंग विभागाचे अधिकारी, कर्मचारी, प्रशिक्षणार्थी विद्यार्थी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या रॅलीमध्ये नर्सिंग अधिकारी प्राचार्य खेडेकर, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. धोंगटे, नेत्रतज्ञ डॉ. साईनाथ तोडकर, तसेच नेत्र विभागातील सर्व कर्मचारी, अधिसेविका, मेट्रन व इतर आरोग्य कर्मचारी यांनी सक्रीय सहभाग घेतला.

# बुलढाणा जिल्ह्यात एम-सॅण्ड धोरणाची अंमलबजावणी सुरु

## पहिल्या ५० पात्र अर्जदारांना विविध शासकीय सवलती मिळणार

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महसूल व वन विभागाच्या २३ मे २०२५ च्या शासन निर्णयानुसार एम-सॅण्ड (कृत्रिम वाळू) धोरण निश्चित करण्यात आले असून शासन परिपत्रक दि १७ जुलै २०२५ नुसार शासनाने याबाबतची मानक कार्यप्रणाली निश्चित केली आहे. त्यानुसार बुलढाणा जिल्ह्यात एम-सॅण्ड धोरणाची अंमलबजावणी सुरू असून जिल्ह्यातील पहिल्या ५० इच्छुक पात्र अर्जदारांना एम-सॅन्डबाबत विविध शासकीय सवलती देण्यात येणार आहेत.

एम-सॅण्ड युनिट स्थापनेसाठी मिळणाऱ्या प्रमुख सवलतीनुसार औद्योगिक मान्यता, अनुदान (उदा. औद्योगिक प्रोत्साहन, व्याज, वीज कर), मुद्रांक शुल्क माफी, रॉयल्टीमध्ये ४०० रुपये प्रति ब्रास सवलत देवून (२०० रु प्रतिब्रास दराची तरतुद), शासन किंवा निमशासकीय बांधकामांमध्ये सध्या एम-सॅन्डचा २० टक्के वापर बंधनकारक, टप्याटप्प्याने हे प्रमाण १००% एम-सॅण्ड वापर बंधनकारक.



शासकीय जमिनीवर खाणपट्टा लिलाव पद्धतीने दिला जाणार असून, केवळ ''१००% एम-सॅण्ड उत्पादक'' असलेल्यांनाच पात्रता राहील. खाजगी जमिनीवर इच्छुक ''१००% एम-सॅण्ड उत्पादक'' अर्जदारांनी महाखनिज पोर्टलवर अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. १५ दिवसांत अर्ज सादर करणेबाबत जिल्हा प्रशासनाने आवाहन केले आहे. पूर्वीचे खाणपट्टे जर ''१००% एम-सॅण्ड उत्पादन'' करणार असतील, तर त्यांनाही धोरणांतर्गत लाभघेता येणार. प्रत्येक प्रकरणात प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सीटीई, नियोजन प्राधिकरणाचे नाहरकत प्रमाणपत्र, उद्योग आधार किंवा जिल्हा उद्योग केंद्राची नोंदणी, तसेच आवश्यक परवानग्या अनिवार्य राहतील. युनिट सुरू करण्यासाठी ६ महिने अवैध उत्खनन वा वाहतूक प्रकरणात दोषी असलेल्यांना अर्ज करता येणार नाही. इच्छुक अर्जदार यांनी शासनाची मान्यता मिळाल्यानंतर युनिट सुरू करण्यासाठी ६ महिन्यांची कालमर्यादा बंधनकारक आहे. युनिट सुरू करण्याआधी प्रदुषण विभागाचे कंटेंट टू ऑपरेट घेणे बंधनकारक आहे.

अर्ज कसा करायचा : अर्ज करण्यासाठी https://mahakhanij.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाऊन अप्लिकेशन हा पर्याय निवडुन त्यामधील एम सॅण्ड कन्सेशन अप्लिकेशनमधून अर्जाचा पर्याय निवडुन अर्ज करावा. संपर्क कुठे करायचा : एम-सॅण्डबाबत कोणतीही अडचण असल्यास गौण खनिज शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी शासन निर्णय दि. २३ मे २०२५ आणि शासन परिपत्रक दि. १७ जुलै २०२५ यांचा संदर्भ घ्यावा. एम-सॅण्ड धोरणाच्या अनुषंगाने जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# विशेष सहाय योजनेतील डिबीटी न झालेल्या लाभार्थ्यांना घरभेटी करून डिबीटी व्दारे अनुदानाचे वाटप करणे

दैनिक आपला विदर्भ

**बार्शीटाकळी/प्रतिनिधी :** तहसिल कार्यालय बार्शिटाकळी येथे महाराष्ट्र शासनाचे दिनांक २९ जुलै २०२५ चे शासन निर्णयातील निर्देशानुसार महसुल सप्ताह निमित्त मा.जिल्हाधिकारी अकोला अजित कुंभार (भाप्रसे) , मा.उपविभागीय अधिकारी मुर्तिजापुर संदीपकुमार अपार व तहसिलदार बार्शिटाकळी राजेश वझिरे यांच्या मार्गदर्शनात बार्शिटाकळी तालुका मध्ये 'विशेष सहाय योजनेतील डिबीटी न झालेल्या लाभार्थ्यांना घरभेटी करून डिबीटी व्दारे अनुदानाचे वाटप करणे' अभियान संपन्न झाल्याबाबत नितीन मात्रे नायब तहसलिदार बार्शिटाकळी यांनी माहिती दिली.

सदर महसुल विभागातील अभियान दरम्यान बार्शिटाकळी तालुक्यातील सर्व ग्राम महसुल अधिकारी यांनी संजय गांधी योजना विभागातील लाभार्थी यांचे घरोघरी भेटी देऊन शासनाचे डिबीटी पोर्टल व्दारे राज्य पुरस्कृत शासनाचे विशेष सहाय योजनेतील श्रावण बाळ योजना व संजय गांधी निराधार योजना लाभार्थी यांच्या डिबीटी पोर्टलवरील त्रुटीचे निराकरण केले. ज्या लाभार्थी यांचे आधार अपडेट नाही व आधार बँक संलग्नीकरण नाही याबाबत लाभार्थी यांना योग्य मार्गदर्शन करण्यात आले.



सदर मोहिमे दरम्यान लाभार्थी यांचे आधार प्रमाणीकरण करून डिबीटी व्दारे अनुदान वाटप करिता पात्र करण्यात आले. सदर विशेष माहिमे दरम्यान एकुण ६५ लाभार्थी मंजुर करण्यात आले असून एकुण ९०४२ लाभार्थी शासनाचे डिबीटी पोर्टलवर रजिष्ट्रेशन करण्यात आलेले आहे. तसेच एकुण ८५१५ लाभार्थी यांचे डिबीटी पोर्टलवर आधार प्रमाणीकरण करण्यात आलेले आहे.




तसेच ज्या वयोवृध्द व दिव्यांग लाभार्थी यांचे डोळयांचे रेटिना आणि बोटांचे ठसे येत नसल्याने आधार अपडेट होत नाही त्याबाबतची एकुण ०६ लाभार्थी यांची माहिती अनुदान मिळणेकरिता शासनाकडे सादर करण्यात आली. तसेच बार्शिटाकळी तालुक्यातील अशाप्रकारचे वयोवृध्द व १०० टक्के दिव्यांग लाभार्थी आधार अपडेट होत नसल्याने अनुदान पासून वंचित झालेले आहे अशा लाभार्थ्यांना खातेक्रमांकवर थेट डिबीटीने अनुदान वाटप करणेबाबत शासनास विनंती करण्यात आली

करिता आशाप्रकारच्या लाभार्थी यांनी तात्काळ तलाठी कार्यालय अथवा तहसिल कार्यालयात संपर्क साधावा असे आवाहन तहसिलदार बार्शिटाकळी श्री राजेश वझिरे यांनी यादरम्यान केले आहे.

महसुल विभागामार्फत आयोजीत सदर माहिमे करिता तहसिलदार बार्शिटाकळी श्री राजेश वझिरे, नायब तहसलिदार नितीन मात्रे, निवासी नायब तहसिलदार श्री अतुल सोनवणे, सर्व मंडळ अधिकारी, सर्व ग्राम महसुल अधिकारी, सर्व महसुल सेवक तसेच तहसिल कार्यालयातील महसुल सहायक रंजित राठोड व डिबीटी ऑपरेटर मो. शाकिर यांनी परिश्रम घेतले. तसेच कार्यालयातील नायब नाझर अमोल बेलखेडे यांनी प्रसिध्दी केली.

## विविध वृत्त...

### शहरातील मधुबापू माळी जलकुंभला गळती; लाखो लिटर पाण्याची होत आहे नासाडी



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :**धुळे शहरातील जुने धुळे परिसरात असलेला मधुबापू माळी या धुळे महानगरपालिकेच्या पिण्याच्या पाण्याचा जलकुंभाला गेल्या अनेक दिवसांपासून गळती लागली असून त्यामधून लाखो लिटर पिण्याचे पाणी वाया जात आहे. मात्र या जलकुंभाकडे धुळे महानगरपालिकेने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे का? असा सवाल आता नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

याच पार्श्वभूमीवर संबंधित मधुबापू माळी जलकुंभाच्या पाईपलाईनची दुरुस्ती तात्काळ करावी अशी मागणी मागील आठवड्यात ठाकरे सेनेच्या वतीने करण्यात आली होती, मात्र अद्याप पर्यंत देखील धुळे महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केल्यामुळे त्यांच्यावर आयुक्तांनी निलंबनाची कारवाई करावी अशी मागणी शिवसेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

### केशवराज संस्थान च्या वतीने श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सव

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** केशवराज संस्थान करुणेश्वर मंदीर येथे १० ते १६ ऑगस्ट दरम्यान श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम पार पडणार असून, या कार्यक्रमाचा पंचक्रोशीतील भाविक, भक्तांनी लाभ घेण्याचे आवाहन संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे. या महोत्सवा दरम्यान दररोज अखंड वीणा वादन, सकाळी ५ ते६ काकडा आरती, ६ ते ८ श्री स अभिषेक, १० ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता ॲड. भवानीपंत काळू व गिरीजा काळू यांच्या हस्ते धर्मध्वजारोहण, सकाळी ९ ते दुपारी १ भागवत स्वाहाःकार, शतचंडी स्वाहाःकार, दररोज दुपारी २ ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत श्रीमद् भागवत कथा व ज्ञानयज्ञ सप्ताह, वाचक नितीन देशमुख महाराज, रात्री ८.३० ते १०.३० वाजेपर्यंत दिपयज्ञ गायत्री परिवार, ११ ऑगस्ट रोजी रात्री ८.३० ते १०.३० वाजेपर्यंत बालक कलाकार प्रिती पाठक व संच, यांचे शास्त्रीय व सुगम संगीत, १२ ऑगस्ट रोजी रात्री ८.३० ते १०.३० वाजेपर्यंत भजन, १३ ऑगस्ट रोजी रात्री ८.३० ते १०.३० वाजेपर्यंत सुभाष महाराज खरोळा यांचे कीर्तन, १४ ऑगस्ट रोजी रात्री ८.३० ते १०.३० ज्ञानेश्वरी काळबांडे, झालकवाडी यांचे वारकरी कीर्तन, १५ ऑगस्ट रोजी दुपारी १२.३० वाजता श्री चा पालखी सोहळा, रात्री ११ वाजता जन्मसोहळा, १६ ऑगस्ट रोजी सकाळी ९.३० ते ११ वाजता यज्ञाची पुर्णाहुती अवभ्रुत स्नान, सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत नामदेव महाराज काकडे यांचे काल्याचे किर्तन, दुपारी १ ते ४ वाजेपर्यंत महाप्रसादाने श्रीकृष्ण जन्मोत्सवाचा समारोप होणार आहे. या कर्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन, लक्ष्मण जनार्दन शास्त्री व जन्माष्टमी महोत्सव समितीचे, केशव गोविंदराव गाडगे यांनी केले आहे.




### वैध मापन शास्त्र कार्यालयाचा मंगळवारी जनता दरबार

**बुलढाणा/प्रतिनिधी :** वैध मापन शास्त्र कार्यालयीन प्रक्रियेत पारदर्शकता आणणे, नागरिकांच्या अडचणी समजून घेणे व ग्राहकांच्या तक्रारींचे त्वरित निवारण करण्याच्या उद्देशाने उपनियंत्रक, वैध मापन शास्त्र, बुलढाणा कार्यालयाच्या वतीने जनता दरबार हा अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

या उपक्रमाअंतर्गत प्रत्येक महिन्याच्या पहिल्या मंगळवारी जनता दरबार आयोजित करण्यात येणार आहे.. या दरबारात नागरिकांना कार्यालयाशी संबंधित शंका, तक्रारी किंवा सूचना थेट मांडण्याची संधी मिळणार आहे. या जनता दरबाराची वेळ दुपारी १ ते २ वाजेपर्यंत निश्चित करण्यात आली आहे.

नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा आणि आपल्या अडचणी, शंका किंवा सूचना थेट कार्यालयात उपस्थित राहून मांडाव्यात, असे आवाहन नि.रा.म्हेत्रे, उपनियंत्रक, वैध मापन शास्त्र, बुलढाणा यांनी केले आहे.



## साहित्य अकादमीचे बाल साहित्य व युवा साहित्य पुरस्कार २०२६ साठी आवाहन पुस्तकांच्या नोंदणीला सुरुवात

नवी दिल्ली/वृत्तसंस्था : साहित्य अकादमीने बाल साहित्य पुरस्कार २०२६ आणि युवा साहित्य पुरस्कार २०२६ साठी पुस्तकांची नोंदणी सुरू केली आहे. अकादमीने मान्य केलेल्या २४ भारतीय भाषांमधील लेखक, प्रकाशक तसेच साहित्यप्रेमींना आपली पुस्तके पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

बाल साहित्य पुरस्कारासाठी पात्रता

बाल साहित्य पुरस्कार २०१० पासून दरवर्षी २४ भारतीय भाषांमध्ये उत्कृष्ट बालसाहित्य निर्मितीसाठी दिला जातो. मराठीसह, आसामी, बंगाली, बोडो, डोगरी, इंग्रजी, गुजराती, हिंदी, कन्नड, काश्मीरी, कोकणी, मैथिली, मल्याळम, मणिपुरी, नेपाळी, ओडिया, पंजाबी, राजस्थानी, संस्कृत, संथाली, सिंधी, तमिळ, तेलुगु आणि उर्दू या भाषांमध्ये लिहिलेली पुस्तके विचारात घेतली जातील.

## मारहाण प्रकरणात हक्कभंग समिती आणि सदस्य गंभीर : आमदार नरेंद्र भोंडेकर

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** विधानभवनाच्या हक्क भंग समितीची उद्या बैठक आहे.अधिवेशनात शेवटच्या दिवशी झालेली शिवीगाळ आणि मारहाण याबद्दल अध्यक्षांनी गंभीर दखल घेतली आहे. आणि हक्क भंग समितीकडे सुपूर्द केलाय. मागच्या आठवड्यात आमच्या समितीकडे टू प्रकरण आलं आहे. यामध्ये दोन्ही आमदारांना त्यांचं काय म्हणण आहे. यासाठी त्यांना १५ दिवसात म्हणण मांडण्यासाठी नोटीस पाठवली आहे. तर काही लोकावर गुन्हे नोंदविण्यात आलेत. २८८ आमदाराच्या सुरक्षेचा प्रश्न असल्याने उद्या मुंबई पोलिस आयुक्ताने देखील बोलावल आहे. काही लोकांवर क्रिमिनल केसेस आहेत अशी आम्हाला माहिती मिळत आहे. त्यामुळे यांची पार्श्वभूमी काय आहे. हे तपासायची गरज आहे. हे सर्व हेतू परस्पर किंवा मोठ घातपात करण्याच्या उद्देशाने तर नव्हता याचा तपास केला जाणार आहे. हे दोघांमधील आपसातील वाद असल्यामुळे समिती त्यांना अगोदर संधी देते की त्यांचं म्हणण काय. याचा निष्कर्ष काढण्यासाठी त्यांना फॉर्मलिटी म्हणून नोटीस दिली आहे. त्यानंतर त्यावर काय निर्णय घ्यायचे ते ठरवू,दोन्ही आमदारांना पंधरा दिवसाची नोटीस दिल्याने ते उद्याच्या बैठकीत उपस्थित राहणार नाहीत.अशी माहिती आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी माध्यमांशी बोलताना दिली.


## वाशीम शहरातून जाणारा मुख्यमार्ग ११ मिटर रुंदीचा असणार

### जुन्या झाडांचे संवर्धनही होणार; खासदार संजय देशमुख यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** वाशीम शहरामधून जाणारा मुख्य मार्ग मधोमध ११ मिटर रुंदीचा राहणार आहे . हा रस्ता तयार करतांना या मार्गावर दुतर्फा असलेली जुनी झाडे कायम ठेवून त्याचेही सौंदर्यीकरण करण्यात येणार आहे . यामध्ये नागरिकांची कुठलीही गैरसोय होणार नाही , याची काळजी घेतली जाईल. यासंदर्भात केंद्रिय मंत्री नितीन गडकरी आणि संबंधित अधिकाऱ्यांशी सकारात्मक चर्चा झाली आहे. अशी माहिती यवतमाळ - वाशीम मतदार संघाचे खासदार संजय देशमुख यांनी ३ ऑगस्ट रोजी पत्रकार परिषदेत दिली.

यासंदर्भात अधिक माहिती देतांना खासदार संजय देशमुख म्हणाले की, वाशीम शहरामधून जाणाऱ्या १६१ क्रमांकाच्या राष्ट्रिय महामार्गाचे चौपदीकरण होणार असल्याची चर्चा आणि वाशीमकरांचा समज होता. मात्र , या रस्त्याच्या कामास प्रत्यक्षात सुरुवात झाली तेंव्हा या रस्त्याच्या दुपदरीकरणास सुरुवात झाली. त्यामुळे नागरीकांचा संभ्रम वाढला. त्यानुषंगाने प्रसार माध्यमांमध्ये तशा बातम्याही प्रसिद्ध झाल्या. आणि माझ्याकडे नागरीक व व्यापाऱ्यांच्या तक्रारी सुद्धा आल्या. यावर मी तत्काळ संसद सभागृहात प्रश्न उपस्थित करून या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधले. सोबतच केंद्रिय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन वस्तुस्थिती आणि जनतेच्या भावना त्यांच्यासमोर मांडल्या.



दरम्यान ना. गडकरी साहेबांनी यासंदर्भात अतिशय सकारात्मक भूमिका घेऊन संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली आणि डिपीआर प्लॅनही मंजुर करून घेतला. त्यामुळे वाशीम शहरामधून जाणारा हा मुख्य रस्ता ३३ फुट रुंदीचा ( दोन लेन) राहणार आहे . सोबतच झाडांच्या संवर्धनाकरीता दोन्ही बाजूला प्रत्येकी ८ फुट जागा सोडली जाणार अजुन त्यालगत ३ फुटाचा फुटपाथ ( नाली) ठेवला आहे . सोबतच नागरिकांना दैनंदिन रहदारीसाठी दोन्ही बाजुंनी प्रत्येकी १८ फुट रुंदीचा सर्विस रोड ठेवला आहे . त्यामुळे हा संपूर्ण रस्ता १०० फूट रुंदिचा होणार आहे.

विशेष म्हणजे या रस्त्यावर सौंदर्यीकरणाच्या दृष्टीने सुद्धा संबंधित यंत्रणा उपाययोजना करणार असल्याचे शेवटी खासदार संजय देशमुख यांनी सांगितले. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सुरेश मापारी, समन्वयक डॉ. सुधिर कवर, काँग्रेसचे प्रदेश सरचिटणास ॲड. दिलीपराव सरनाईक, काँग्रेसचे नेते राजुभाऊ चौधरी, किसनराव मस्के, गजानन देशमुख, सुरेश कदम, गजानन भांदूर्गे, ॲड. पि. पि. अंभोरे आदिंची उपस्थिती होती.

## चातुर्मासानिमित्त पंचमुखी हनुमान मंदिर येथे महाप्रसादाचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

■ अशोक मुंढे

**महार चिकना :** दरवर्षी सालाबादाप्रमाणे यावर्षी सुद्धा अंजनी खुर्द येथील श्री बाळकृष्ण जी राठी अध्यक्ष जनता शिक्षण संस्था अंजनी खुर्द यांच्याकडून पंचमुखी हनुमान मंदिर संस्थान खळेगाव फाटा येथे दिनांक ४ ऑगष्ट रोजी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते

येथे महाप्रसादासाठी खळेगाव, कारेगाव, अंजनी खुर्द, महार चिकना येथील बरीच भावीक भक्त मंडळी उपस्थित होती श्रावण मास हा शक्ती आणि सेवा यांचा संगम असणारा हिंदू धर्मीयांचा महत्त्वाचा महिना मानला जातो या महिन्यात शिवपूजा बऱ्याच ठिकाणी केली जाते त्याचे औचित्य साधून श्री बाळकृष्ण जी राठी यांनी पंचमुखी हनुमान मंदिरावर महाप्रसादाचे आयोजन केले परिसरातील भजनी मंडळी व भाविक मंडळी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते



# महसूल प्रशासन हे जनतेच्या दारात न्याय आणणारे व्यवस्थापन आहे : उपविभागीय अधिकारी देवकर

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** महसूल विभाग हा शासनाच्या कार्यपद्धतीतील महत्त्वाचा कणा आहे. सामान्य जनतेच्या संपर्कात सर्वाधिक वेळ येणाऱ्या या विभागाची जबाबदारी मोठी असून त्यातून जनतेचा शासनावरचा विश्वास दढ होतो. महसूल सप्ताह निमित्ताने आपण विविध योजनांचे आदेश, दाखले, सनद आणि मंजुरी पत्रकांचे वाटप करत आहोत. हे वाटप ही केवळ कागदांची देवाणघेवाण नसून, ही लोककल्याणाच्या दृष्टीने एक महत्त्वाची प्रक्रिया आहे. शासनाच्या योजना खऱ्या अर्थाने सामान्यांपर्यंत पोहोचत आहेत, हेच याचे प्रतिबिंब आहे.असे प्रतिपादन उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर यांनी केले.

१ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट हा महसूल सप्ताह म्हणून साजरा करण्यात येतो. या सप्ताहाअंतर्गत २ ऑगस्ट २०२५ रोजी तहसील कार्यालय, वाशीम येथील नवीन सभागृहामध्ये पात्र लाभार्थ्यांना योजनानिहाय आदेश व कागदपत्रांचे वाटप करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या.

### वाशीम तहसील कार्यालयात विविध योजनांचे आदेश व दाखल्यांचे लाभार्थ्यांना वितरण

आरडीसी घुगे म्हणाले आज महसूल दिनाच्या निमित्ताने आपण विविध योजनांचे आदेश, दाखले, सनद आणि मंजुरी पत्रकांचे वाटप करत आहोत. हे वाटप ही केवळ कागदांची देवाणघेवाण नसून, ही लोककल्याणाच्या दृष्टीने एक महत्त्वाची प्रक्रिया आहे. शासनाच्या योजना खऱ्या अर्थाने सामान्यांपर्यंत पोहोचत आहेत, हेच याचे प्रतिबिंब आहे. आपल्या सर्व महसूल कर्मचाऱ्यांनी नेहमीच पारदर्शक, तत्पर व उत्तरदायी सेवा देण्याचा प्रयत्न केला आहे. लोकांच्या समस्या ऐकून घेऊन त्यावर लवकरात लवकर योग्य निर्णय देणे हे आपले कर्तव्य आहे.महसूल सप्ताह हे केवळ एक औपचारिकता न राहता, कामात नवी ऊर्जा देणारा टप्पा असावा. प्रत्येक कर्मचाऱ्याने हे संकल्पपूर्वक आत्मसात करावे आणि लोकाभिमुख प्रशासनाचा आदर्श निर्माण करावा.

यावेळी तहसीलदार निलेश पळसकर आदी उपस्थित होते. वाशीम तालुक्यातील ६ नागरिकांना २०११ पूर्वीचे अतिक्रमण, जे निकषात बसले आहेत, ते नियमअनुकूल करून सनदांचे वाटप करण्यात आले. ४७ प्रकरणांमध्ये पोटखराब (वर्ग-अ) क्षेत्र लागवडीयोग्य क्षेत्रामध्ये रूपांतरित करून (क.जा.प.) सातबारा वितरित करण्यात आले. ५ नागरिकांना अ.पा.क. पिक कर्ज मंजुरी प्रकरणांचे आदेश वितरित करण्यात आले. भूसंपादन कलम २८ अन्वये वाढीव मोबदला प्रकरणांमध्ये ७ लाभार्थ्यांच्या खात्यात रक्कम जमा करण्याचे आदेश वितरित करण्यात आले. शासन निर्णय अन्वये भोगवटदार वर्ग-०२ मधून वर्ग-०१ मध्ये रूपांतरित करण्याचे आदेश.



सिलींग कायद्याअंतर्गत भोगवटदार वर्ग-२ शेतजमीन विक्रीसाठी परवानगी आदेश. महाराष्ट्र तुकडे बंदी अधिनियम, १९४७ अंतर्गत भोगवटदार वर्ग-०१ शेतजमीन विक्री परवानगी आदेश. शासन निर्णयानुसार धारणाधिकार 'ब' जागा विक्रीस परवानगी आदेश. शासन निर्णयाददनुसार धारणाधिकार 'ब' जागेचे गहाणखत करून कर्ज काढणीस परवानगी आदेश. याशिवाय संगायो , श्रावणबाळ लाभार्थी मंजुरी आदेश, नवीन मतदार कार्ड, रेशनकार्ड, जातीचे दाखले, रहिवासी दाखले आदी प्रकारच्या दाखल्यांचेही वितरण करण्यात आले. कार्यक्रमाला उपविभागीय कार्यालय व तहसील कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. संचालन कैलास देवळे व माधवराव शिंदे यांनी केले, तर आभार पी. यु. मापारी यांनी मानले.